महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
अमरावती शहर पोलीस

**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर**
पोलीस आयुक्त कार्यालय, कॅम्प रोड अमरावती
फोन क्र ०७२१-२५५१००१

---

# सोशल मिडीयावरून आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करण्यातस प्रतिंबध करणेबाबत मा. डॉ. आरती सिंह, पोलीस आयुक्त यांचा आदेश जारी......

-------//--------

दि. २१/११/२०२१

दिनांक १३.११.२१ रोजी अमरावती शहरामधे निर्माण झालेल्या जातीय तनावाचे अनुषंगाने पोलीस आयुक्त अमरावती शहर मध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता दि.१३.११.२१ रोजीचे ११. ०० वा. पासुन पुढील आदेशापर्यंत संपुर्ण अमरावती शहरासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम-१४४ (१) (२) (३) अंतर्गत संचारबंदीचे आदेश लागु करण्यात आले आहे. त्यानंतर संचारबंदीमधे काही वेळे करीता शिथिलता देण्यात आलेली आहे. भविष्यकाळामध्ये अमरावती शहरामध्ये सामाजिक व जातीय सलोखा कायम राहण्यासाठी सोशल मिडीयावरून प्रसारित होणा-या आक्षेपार्ह व जनप्रक्षोभक पोस्ट या सोशल मिडीयावरून प्रतिबंधीत करण्याकामी भारतीय दंड संहितेचे कलम-५०५,१५३ अ व ११६ नुसार दंडनिय अपराध असल्याने सदर बाबत आदेश निर्गमित होणे आवश्यक असल्याचे मा. पोलीस आयुक्त यांचे निदर्शनास आल्याने आजरोजी सोशल मिडीयावरून आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करण्यातस प्रतिंबध करणेबाबत आदेश जारी करण्यात आला. त्यानुसार

१. कोणत्याही प्रकारे ,धर्म भाषा,जात किंवा जनसमाज यांचे किंवा अन्य कोणत्याही कारणावरून निरनिराळे धार्मिक,वंशिक,भाषिक किंवा प्रादेशीक गट अगर जाती,अगर जनसमाज यांचे मध्ये तेढ अथवा शत्रृत्वाचा, द्वेषाची भावना निर्माण होईल अशा आक्षेपार्ह पोस्ट किंवा अफवा व अनधिकृत माहिती सोशल मिडीयाचे माध्यमातुन पसरविणारे व्यक्ती अथवा संस्था अथवा संघटना या कायदयान्वे कायदेशीर व दंडनिय कारवाईस पात्र राहिल.
२. निरनिराळे धार्मिक,भाषिक किंवा प्रादेशीक गट अगर जाती अगर जनसमाज यांचे मध्ये एकोपा टिकण्यास बाधक अशी आणि ज्यामुळे सार्वजनिक प्रशांतता बिघडते किंवा बिघडणे संभावित असते अशा पोस्ट सोशल मिडियाचे माध्यमातुन पसरविणारे व्यक्ती अथवा संस्था अथवा संघटना याकायदयान्वये कायदेशीर व दंडनीय कारवाईस पात्र राहिल.
३. एखादी व्यक्ती सार्वजनिक उपद्रव,अपराध करण्यास प्रवृत्त होईल अशा प्रकारे जनतेमध्ये अथवा जनतेपैकी एखादया भागामध्ये भिती किंवा भयग्रस्त वातावरण निर्माण होईल किंवा त्यामुळे तसे होण्याची शक्यता असेल किंवा एखादया समुहातील व्यक्तींना दुस-या कोणत्याही वर्गाविरूध्द किंवा समुहाविरूध्द कोणाताही अपराध करण्यास चिथावणी देण्याचा उद्देश किंवा चिथावणी दिली जाण्याची श्शक्यता असेल अशा पोस्ट सोशल मिडीयाचे माध्यमातुन पसरविणारे व्यक्ती अथवा संस्था अथवा संघटना या कायदयान्वये कायदेशीर दंडनीय कारवाईस पात्र राहिल.

Scanned with CamScanner

---

४. सोशल मिडीयावर जो कोणी व्यक्ती संस्था,संघटना हा ॲडमिन म्हणुन कार्यरत असेल त्यांनी त्यांचे ग्रूपवर कोणत्याही प्रकारच्या प्रक्षोभक पोस्ट प्रसारित होणार नाही या बाबत काळजी घ्यावी अन्यथा सदर ॲडमिन नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहिल.

त्याचप्रमाणे या आदेशान्वये विहित करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधाची किंवा काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता ( १८६० चा ४५) यांचे कलम-१८८ अन्वये शिक्षा पात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश अमरावती पोलीस आयुक्तालय अमरावती शहराकरीता दि.२१.११.२१ पासुन पुढिल आदेशापर्यत लागु करण्यात येत आहे.

डॉ. आरती सिंह
पोलीस आयुक्त , अमरावती शहर

Scanned with CamScanner